(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com


क्र.मजीप्रा/२०१३/सभा-१२८/(१४)/आ.४ दिनांक : १६.४.२०१३

प्रति,
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : दि.२५.३.२०१३ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२८व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सोमवार दि.२५.३.२०१३ रोजी झालेल्या १२८व्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीसाठी यासोबत सादर करण्यांत येत आहे.

सोबत : १२८ व्या सभेचे इतिवृत्त
पृ.क्रं. १ ते

आपला विश्वासू,
(स्वाक्षरी) १६/४/१३
(पंजाबराव वानखडे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

(२)

प्रत :

१. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नागरी व ग्रामीण योजना, ठाणे /जलव्यवस्थापन, ठाणे,/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे,/अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक./मध्यवर्ती नियोजन. मित्तल टॉवर्स, मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाबीवर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

२. संचालक (वित्त) म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई,

वित्त व लेखा शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१,३,४(अ), ४(ब) ६, व ७ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

३. अधीक्षक अभियंता, म.नि.स.स. म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

आपल्या शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.५, ६, ९, व अतिरिक्त कार्यक्रम बाब क्र.१ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

४. अधीक्षक अभियंता (मुख्यालय) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

५. अधीक्षक अभियंता(यां.) म.जी.प्रा. ठाणे/ नागपूर.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.८ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

६. उप मुख्य लेखा अधिकारी (१) व (२) मजीप्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

७. उप सचिव, पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,

८. आस्थापना अधिकारी (दक्षता) मजीप्रा, नवी मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१ व २ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

९. प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई,

१०. कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

११. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी (आस्थापना- ) / कार्यासन अधिकारी (आ- ) यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

१२. सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व संबंधितांनी कार्यपूर्ती अहवाल दि.२९.४.२०१२पर्यंत सादर करावा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२८ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२८ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक २५ मार्च २०१३ रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री. लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.जयंत पाटील, मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष.
३. मा.सुनील पोरवाल, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि. म. म्हात्रे, सह सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. ४०००३२.
५. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई ४०००३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री.पंजाबराव वानखडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई.
२. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, ठाणे.
३. श्री. व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्र.व्य.सल्लागार सेवा, पुणे.
४. श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा. मुंबई,
५. श्री. एस.बी.भुजबळ (प्रभारी)अधीक्षक अभियंता (म.नि.स.स.) म.जी.प्रा. मुंबई.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:**

विषय: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२७ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

दिनांक २६.२.२०१३ रोजी संपन्न झालेल्या १२७ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देताना कार्यक्रम बाब क्र. ५ नुसार मीत्रा नाशिक या स्वायत्त संस्थेला सन २०१३-१४ या वर्षाकरिता वेतन व भत्ते, प्रशिक्षण व संशोधन व कार्यालयीन खर्च इत्यादीकरिता शासनाकडून निधी प्राप्त होईपर्यंत गेल्या ५ वर्षाच्या खर्चाच्या सरासरी एवढा रु.१२५.८० लक्ष निधी मजीप्रातर्फे देण्यात येईल व हा

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

8/4

सदस्य सचिव
म.जी.प्रा.
5/4/2013

निधी शासनाकडून अनुदान प्राप्त होईपर्यंत पुढील १० वर्षे मजीप्रातर्फे उपलब्ध करुन देण्यात येईल असा निर्णय झाला होता. तथापि मीत्रा ही संस्था स्वायत्त झाल्यानंतर मीत्रा या संस्थेचे बळकटीकरण करण्याकरिता व पाणी व मलनि:स्सारणावर तांत्रिक संशोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणात घेण्याकरिता या संस्थेला लागणाऱ्या जास्त निधीची गरज लक्षात घेता मीत्राला मजीप्रातर्फे दरवर्षी रु.१.५० कोटी निधी मंजुर करण्यात यावा असा सुधारित निर्णय घेण्यात आला.

. याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले. यासह दि.२६.२.२०१३ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२७ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२७ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २६.२.२०१३ रोजी संपन्न झालेल्या १२७व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले. त्याबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. तसेच निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.३:**

**विषय:** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय. दि.१३.३.२००६ व शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय. मुंबई-३२. दि.२२.३.२००६ तसेच शासन निर्णय क्र.शासाउ/१००५/प्र.क्र.२६/साउ दि.१.७.२०१० अन्वये मुंबई-३२. सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित झाली आहेत. यानुसार अल्प मुदतीच्या गुतवणूकी सदस्य सचिव यांच्या मान्यतेने केल्या जातात व शासन निर्णयातील सूचनेनुसार अशा अल्प मुदतीच्या गुतवणूकी संचालक मंडळाच्या प्रत्येक बैठकीत मान्यतेसाठी सादर केल्या जातात. प्रस्तुत कार्यक्रम बाबीमध्ये अल्प मुदतीच्या कालावधीसाठी केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव असून ते मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांच्या मान्यतेने केली आहे. केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव शासन

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

8/4

सदस्य सचिव
म.जी.प्रा. 7/4/2013

निर्णयानुसार असल्याने प्रस्ताव मान्य करण्यांत यावा असे सदस्य सचिव यांनी नमुद केले.
चर्चेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

ठराव :

असा ठराव करण्यांत येतो की, दि.२०.२.२०१३ ते दि.१५.३.२०१३ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४:**

विषय: अ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाज व सन २०१३-१४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणे.

सदस्य सचिव, यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१२-२०१३ चे सुधारित अंदाज व सन २०१३-२०१४ चे अर्थसंकल्पीय अंदाज संचालक मंडळासमोर सादर केले. सदस्य सचिव यांनी असेही नमुद केले की, वेतन, भत्ते व निवृत्ती वेतन आता स्वबळावर अदा करण्यात येत असून आता योजनेचा निधी वापरला जात नाही. सन २०१३-२०१४ चे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ३३.२६ कोटी अधिक्य राहील असे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले. यावर चर्चा होऊन संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे ठराव संमत केला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन-२०१२-१३ चे सुधारित अंदाज व सन-२०१३-१४ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र | तपशिल | सन-२०१२-१३चे सुधारित अंदाज | सन-२०१३-१४ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | ४३२४८.५१ | ४७७२०.२१ |
| २ | महसुली खर्च | ४२०७६.४५ | ४४३९४.५४ |
| ३ | भांडवली जमा | ११५६०३.७९ | ८८५२९.३२ |
| ४ | भांडवली खर्च | ११५६०३.७९ | ८८५२९.३२ |

मा. अध्यक्ष तथा
मंत्री. पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दि.२१/११/२०१२ रोजी झालेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने निर्गमित झालेल्या इतिवृत्तानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनाचा खर्च शासनाने अंदाजपत्रकीय तरतुदीद्वारे सोसण्यासाठी व ई.टी.पी.चे दर पाटबंधारे व जलसंपदा विभागाप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्ताव शासनास त्वरीत पाठवावेत.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

ब) प्राधिकरणाचा सन २०१२-१३ चा वार्षिक लेखा स्विकृत करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत सदस्य सचिव यांनी म.जी.प्रा.च्या सन २०१२-१३ वर्षाच्या वार्षीक लेख्याबाबत संचालक मंडळास अवगत केले. याबाबत सविस्तर चर्चा होवून संचालक मंडळाने सन २०१२-१३ च्या वार्षिक लेख्यांना मान्यता प्रदान करुन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

ठराव :

असा ठराव करण्यांत येतो की, म.जी.प्रा.च्या सन २०१२-१३ वर्षाच्या वार्षिक लेख्यास मान्यता देण्यांत येत असून या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५:**

**विषय:** एका कंत्राटदाराला जास्तीत जास्त किती कामे देण्यांत यावीत याबाबत घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

एका कंत्राटदाराला जास्तीत जास्त किती कामे देण्यात यावीत, याबाबत मजीप्राच्या दि. १४.१०.१९९८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३३६४ च्या परिपत्रकान्वये घेतलेला निर्णय रद्द करण्यात यावा. अशी विनंती मे.लक्ष्मी सिव्हाल इंजिनिअरिंग सर्विसेस. प्रा.लि.,कोल्हापूर यांनी मा.मंत्री.पा.पु.व स्व. यांच्याकडे केली होती.

सदर पत्रावर, सदर परिपत्रक रद्द करण्याचा प्रस्ताव बोर्डापुढे सादर करण्याचे निर्देश प्राप्त झाल्याने, योग्य तो निर्णय घेण्यासाठीची कार्यक्रम बाब दि.१४.८.२०१२ रोजी संपन्न झालेल्या मा.संचालक मंडळाच्या १२४ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

8/4

सदस्य सचिव
म.जी.प्रा.
5/4/2013

तथापि, ठेकेदारांच्या संघटनांनी सदर निर्णयाच्या अनुषंगाने नाराजी व्यक्त करुन, सदर निर्णय बदलण्याबाबतची विनंती मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्याकडे केली असून, त्यानुसार उचित निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत करताना अशी तरतूद सार्वजनिक बांधकाम संहितेमध्ये नसून, ठेकेदाराच्या आर्थिक क्षमतेबाबत पुर्वअर्हता अट आजही निविदेत अंतर्भूत असल्याने, ठेकेदाराच्या आर्थिक क्षमतेबाबतची खात्री निश्चित होते, असेही अवगत करण्यात आले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन, मजीप्राने दि.१४.१०.१९९८ रोजी निर्गमित केलेले जा.क्र.मजीप्रा/ सस/तांशा-१/३३६४ चे परिपत्रक रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येऊन, पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की,तत्कालिन मा.संचालक मंडळाने दि.१७.९.१९९८ रोजी संपन्न झालेल्या ८१ व्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार दि.५.१०.१९९८ रोजी संपन्न झालेल्या निविदा समितीच्या ८व्या बैठकीत मंजुरी प्रदान करण्यात आल्यानंतर दि.१४.१०.१९९८ रोजी निर्गमित करण्यांत आलेले जा.क्र.मजीप्रा/ सस/तांशा-१/३३६४ चे परिपत्रक रद्द करण्यास मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. त्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६:**

**विषय:** बल्लारपूर पाणी पुरवठा योजना, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर.

किरकोळ घरगुती पाणी पुरवठ्याचे दर कमी करण्याबाबत.

सदर विषयाबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

बल्लारपूर पाणी पुरवठा केंद्रातून शहरात १३५ लिटर्स दरडोई दर दिवशी सर्वसाधारणपणे तसेच उन्हाळ्यात ७५ लिटर्स दरडोई दर दिवशी प्रमाणे पाणी पुरवठा करण्यात येतो. योजनेमध्ये सद्यःस्थितीत एकूण ७३२७ नळ जोडण्या आहेत.

अधिसुचना क्र. MJP/CE/(WM)/AB/CR-१४/७१२(३) दिनांक २८ मे, २०१२ नुसार ग्राहकांना १ जूलै २०१२ पासून खालीलप्रमाणे दर आकारणी करण्यात येत आहे.

15/4

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

5/4/2013

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| अ. क्र. | तपशिल | १५ युनिट पर्यंत | १५ ते २० युनिट पर्यंत | २० ते २५ युनिट पर्यंत | २५ युनिट च्या वर |
|---|---|---|---|---|---|
| १ | घरगुती | १३ | २० | २६ | ५२.०० |
| २ | बिगर घरगुती | | | | ६०.०० |
| ३ | शाळा, महाविद्यालय व ना नफा ना तोटा तत्वावर चालणाऱ्या संस्था | | | | २५.०० |
| ४ | अ) नळ खांब १५ मिमी व्यास | | | | २३६०.०० प्रति माह |
| | ब) नळ खांब २० मिमी व्यास | | | | ५६७८.०० प्रति माह |

उपरोक्त प्रमाणे पाणी पट्टीमध्ये वाढ केल्यामुळे प्रतीमाह पाणी देयकांची रक्कम रु.२५०/- चे वर येत असल्यामुळे ग्राहकांमध्ये अतिशय नाराजीचा सुर आहे. कारण बल्लारपूर शेजारी असणाऱ्या चंद्रपूर व राजूरा नगर परिषदेमध्ये पाणीपट्टीचे दर प्रतीमाह रु.१००/- चे वर नाही असे ग्राहकांचे म्हणणे आहे व त्याचा परिणाम म्हणून बल्लारपूर पाणी पुरवठा केंद्रावर/नगर परिषदेवर मोर्चे येणे, साखळी उपोषण करणे, पाणी देयकाचा भरणा न करणे इत्यादी बाबीचा मजीप्राचे स्थानिक अधिकाऱ्यांना नेहमी सामना करावा लागत आहे.

त्यामुळे नगर परिषद अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांनी मा. मंत्री महोदयांच्या त्यांचे बल्लारपूर येथील दौऱ्याचे वेळी या बाबी अवगत केल्या, त्यानुसार मा. मंत्री महोदयांनी सदरचे दर बल्लारपूरला किती कमी करता येईल का? किंवा सदर योजना नगर परिषदेच्या मागणीनुसार नगर परिषदेस हस्तांतरीत करणे योग्य राहील किंवा कसे याबाबत नागपूर येथील अधिवेशन काळात दि. २०.१२.१२ रोजी बैठक घेतली. सदर बैठकीत नगर परिषदेने योजना हस्तांतरण करण्याची मागणी केल्यानुसार नगर परिषदेकडे मजीप्राची थकबाकी असलेली रु. १८.५६ कोटीची रक्कम एकमुस्त नगर परिषदेने भरून योजना हस्तांतरीत करुन घ्यावी असे मा. सदस्य सचिव मजीप्रा यांनी सुचविले असता हस्तांतरणाचा निर्णय झाला नाही. नगर परिषद, अध्यक्ष यांनी नगर परिषदेच्या सार्वजनिक नळ खांब्यांसाठी रु. २३६०/- दरमहा प्रति नळखांब पाणी पट्टी आकारणी करण्यात येते त्या नळ खांबाला जलमापक लावून रु. १३/- प्रति युनिट प्रमाणे आकारणी करण्यात यावी तसेच ग्राहकांना २५ युनिट पर्यंत रु. १३/- दर तसेच २५ युनिटच्या वरती [illegible] आकारण्यात यावा, अशी मागणी केली असता मा. मंत्री महोदयांनी याप्रमाणे कार्यवाही करावी असे निर्देश बैठकीत दिले. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

९/४/२०१३
सदस्य सचिव
म.जी.प्रा.

ठराव :

असा ठराव करण्यात येते की, अधिसुचना क्र. MJP/CE/(WM)/AB/CR-१४/७९२(३) दिनांक २८ मे, २०१२ अन्वये दिनांक ०१ जूले, २०१२ पासून विहीत केलेल्या पाणी पट्टीच्या दरात खास बाब म्हणून (अधिसुचनेतील बी-१(i) मध्ये) अंशतः बदल करुन बल्लारपूर शहराकरीता दि.१.२.२०१३ पासून पुढीलप्रमाणे पाणीपट्टी (दर) आकारण्यात यावी. तसेच याबाबत यापुर्वी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**घरगुती किरकोळ पाणी पुरवठयाचे दर :-**

(रुपये)

| अ.क्र. | तपशिल | सध्याचे दर प्रति १००० लि. | प्रस्तावित दर प्रति १००० लि. |
|---|---|---|---|
| | **घरगुती** | | |
| १ | ० ते १५ युनिटपर्यंत | १३.०० | १३.०० |
| २ | १५ ते २० युनिटपर्यंत | २०.०० | १३.०० |
| ३ | २० ते २५ युनिटपर्यंत | २६.०० | १३.०० |
| ४ | २५ युनिटच्या वर | ५२.०० | २०.०० |

**नगरपरिषदेचे नळ खांब दर :-**

(रुपये)

| अ.क्र. | तपशिल | सध्याचे दर प्रति माह | तपशिल | प्रस्तावित दर प्रति १००० लि. |
|---|---|---|---|---|
| १ | १५ मि.मी. व्यास | २३६०.०० | ० ते १५ युनिटपर्यंत | १३.०० |
| २ | २० मि.मी. व्यास | ५६७८.०० | १५ ते २० युनिटपर्यंत | २०.०० |
| ३ | - | - | २० ते २५ युनिटपर्यंत | २६.०० |
| ४ | - | - | २५ युनिटच्या वर | ५२.०० |

नळ खाबांना जलमापके बसविण्यासाठी खालील अटींचा समावेश राहील.

१) नगर परिषदेच्या नळ खांबांना जलमापकांचे परिरक्षण करण्याची व त्याचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्याची तसेच त्याची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी नगर परिषदेची राहील.

२) जलमापके तपासण्याचा खर्च नगर परिषदेकडून मासिक देयकामध्ये ठराविक रक्कम नमूद करुन वसुल करण्यात येईल.

३) जर जलमापके बंद पडली वा तुटफुट झाली तर ३ महिन्याच्या आत नवीन जलमापके नगर परिषदेने स्वखर्चाने बसविणे बंधनकारक राहील अन्यथा ३ महिन्यानंतर सरासरी देयके आकारण्यात येईल.

या बाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री. पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.७:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने काढलेल्या निविदेमधील कार्यकंत्राटकर प्रतिपूर्ती बाबत.

सदर कार्यक्रम बाबींवर सविस्तर चर्चा झाली. परंतु कार्यक्रम बाबीमध्ये कोणताही ठोस प्रस्ताव सादर केलेला नसल्याने निर्णय घेणे शक्य नाही, असे संचालक मंडळाचे मत झाले. म्हणून संचालक मंडळाचा कोणत्या बाबींवर निर्णय आवश्यक आहे, त्या बाबी संबंधीचा संपूर्ण आकडेवारीसहचा ठोस प्रस्ताव संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**कार्यक्रम बाब क्र.८:**

**विषय:** राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वीज खर्चाबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत सदस्य सचिव यांनी वीज खर्चाबाबतची माहिती सविस्तर अवगत केली. सदरची बाब मा.संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ असल्याने कोणताही निर्णय/ठराव पारीत करण्यात आलेला नाही.

**कार्यक्रम बाब क्र.९:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या संपन्न झालेल्या ७८ ते ८० अशा ३ बैठकींमध्ये निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या घेतलेल्या निर्णयावर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार मा.संचालक मंडळात चर्चा होऊन, निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

**अतिरिक्त कार्यक्रम बाब क्र.१**

**विषय:** महाबळेश्वर व पांचगणी शहराच्या पाणी पुरवठा योजनेच्या कोसळलेल्या उद्भव विहीरीबाबत तातडीने पर्यायी उपाययोजनेच्या प्रस्तावास तातडीची योजना म्हणून मंजूरी प्रदान करणे व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले. पांचगणी व महाबळेश्वर या शहरांना पाणी पुरवठा करण्यासाठी म.जी.प्रा. च्या मालकीच्या वेण्णा धरणाच्या खालील बाजूस सुमारे १०० ते १५० मी. अंतरावर एक सामायिक उद्भव विहीर आहे. सदर विहिरीचा दि.२६.६.२०१२ रोजी सकाळी १० ते ११ च्या दरम्यान दगडी विहीरीच्या बांधकामाचा काही भाग पाचगणी शहरासाठी उभारलेल्या पंपावर विहीरीच्या आतील भागात

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

८/४

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

/४/२०१३

कोसळला व पुन:श्च दि., २९.६.२०१२ रोजी या विहीरींचा अजून काही भाग ढासळला व पुढे दि. १३.१०.२०१२ रोजी सदर उद्‌भव विहीर पूर्णतया कोसळली. त्यामुळे या दोन्ही शहरांचा पाणी पुरवठा पूर्णतया बंद झाला होता. त्यावेळी तात्पुरती उपाययोजना करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

त्यामुळे कायमस्वरुपी उद्‌भवाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तांत्रिक सल्लागार डॉ. श्री. एस.एस.कुलकर्णी, नागपूर यांनी केलेल्या समक्ष पहाणीनुसार नव्याने कलेक्टींग वेल व पंप हाऊस बांधण्याचे अभिप्राय दिले असून, त्यानुसार नवीन कलेक्टींग वेल व पंप हाऊस व इतर अनुषंगिक कामाचा अंदाजपत्रके व आराखड्याचा रु.२३१.६८ लक्ष निव्वळ व रु.२९१.५६ लक्ष ढोबळ किंमतीचा प्रस्ताव तयार करुन तातडीची उपाययोजना अंतर्गत एक विशेष बाब म्हणून, तातडीच्या पाणी पुरवठा योजनाना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजुरी देण्यासाठी स्थापित सचिव स्तरीय स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. संदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त यांच्या शिफारशीने सादर झालेला नसल्यामुळे विचारात घेण्यात आला नाही.

त्यामुळे मजीप्राच्या मालकीच्या प्रगतीपथावरील रु.५५.०७ कोटी किंमतीच्या पुनर्संधारित योजनेवरील संभाव्य बचतीतुन सदर प्रस्तावाची कामे करण्यास मंजुरी प्रदान करण्याची विनंती शासनास केली आहे. तथापि, सदर प्रस्तावास काही विलंब लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत सदर काम पावसाळ्यापूर्वी सुरक्षित पातळीवर आणल्यास, पावसाळ्यातही उर्वरित कामे प्रगतीपथावर ठेवता येतील. त्यासाठी सुरक्षित पातळीवर आणावयाच्या कामासाठी सुमारे रु. १.८० कोटी इतक्या निधीची आवश्यकता राहील. सबब, हा निधी तात्काळ उपलब्ध करुन देणे गरजेचे असल्याने, शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळेपर्यंत मजीप्राच्या स्वनिधीतून उपलब्ध करुन शासनाच्या मान्यतेनंतर त्याचे समायोजन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठीचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे संचालक मंडळास सदस्य सचिव यांनी अवगत केले. सदर बाबीवर चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, महाबळेश्वर व पांचगणी शहराचा पाणी पुरवठा सुरळीत सुरळीत चालु राहण्यासाठी तातडीची कायमस्वरुपी उपाययोजना [illegible] मागवून हाती घेण्यासाठी तात्काळ कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावातील जी कामे पावसाळयापुर्वी सुरक्षित पातळीवर आणावी लागणार आहे, त्यासाठी लागणा-या रु.१.८० कोटी निधीची तरतूद मजीप्राने स्वनिधीतून करावी व शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर, त्याचे योग्य ते समायोजन करण्यात यावे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

5/5/2013

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**दिनांक २५/३/२०१३ रोजी प्राधिकरणाच्या १२८ व्या बैठकीत विषयसूचीवरील विषयाशिवाय खालील मुद्यांवर ' चर्चा झाली व त्यावर कार्यवाही करणेबाबत सुचना देण्यात आल्या.**

१. मा.मंत्री, ग्रामविकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष यांनी महाबळेश्वर योजनेची कामे त्वरित सुरु करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

२. (बाब क्र.४) मजीप्रा.मालकीच्या योजना २५ असून त्यात ४० कोटी रुपये फायदा झालेला आहे. या बाबत वर्ग ३ व ४ कर्मचा-याबाबतचा खर्च कमी करणे आवश्यक असल्याचे प्रधान सचिव यांनी सांगितले. ज्या योजना मजीप्रा.मार्फत पूर्ण केल्या जातात. काही दिवस मजीप्रा. कर्मचारी नेमून योजना चालविण्यात येते. त्यानंतर जिल्हा परिषद ती योजना विना कर्मचारी ताब्यात घेते.त्यामुळे योजनेवरील कर्मचारी मजीप्राकडेच राहतात. पर्यायाने त्यांचा सर्व खर्च मजीप्राला द्यावा लागतो. अशा कर्मचाऱ्याकडून बंद पडलेल्या योजना चालवता येतील का याबाबत चर्चा झाली. मजीप्रा. मालकीच्या २५ पा.पु. योजनेमध्ये सुधारित फॉर्मुला तयार करणेबाबत मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सुचविले. याबाबत अभियंते तसेच वर्ग ३ व ४ करिता प्रशिक्षणासाठी अंदाजपत्रकात तरतुद करावी असे मा. मंत्री , ग्रामविकास तथा सहअध्यक्ष, मजीप्रा. यांनी सांगितले.

३. सिंगापूर येथील पा.पु. योजनांच्या पहाणीसाठी मजीप्रातील सदस्य सचिव व वरिष्ठ तांत्रिक अभियंता यांना पाठविण्यात यावेत. दीर्घकाळ अडचणीत असलेल्या अथवा बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सिंगापूर येथील PUB सारख्या नामांकित संस्थेकडून चालू करुन घेणे व त्यांनीच पुढे चालविणे हयाबाबत विचार व्हावा. तसेच असे करताना सदर संस्थेकडून अदयावत तंत्रज्ञान मजीप्रासोबत शेअर करणेबाबत PUB सोबत चर्चा करावी.

४. मजीप्रामध्ये सध्या वर्ग ३ व ४ कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत. त्यामुळे त्यांच्या वेतन व भत्यासाठीचा आर्थिक बोजा मजीप्रावर पडत आहे. याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

१. Performance Related Incentive

२. अतिरिक्त कर्मचाऱ्यांसाठी VRS - वर्ग ३ व ४ करिता प्रस्ताव तयार करणे.

३. मजीप्राच्या योजनांमध्ये सुधारणा करण्यासाठी इतर आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहभागाने काय करता येईल याचा अभ्यास करावा.

WTP- मा.मंत्री, ग्रामविकास तथा सहअध्यक्ष मजीप्रा यांनी सुचविले की पाणी जलशुध्दीकरणाबाबत Advance Technology (UV ) बाबत संशोधन (research) व्हायला पाहिजे.त्यानुसार मीत्रा मार्फत कार्यवाही व्हावी.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

8/4

7/4/2013

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

५. बंद योजना मजीप्राच्या ताब्यात आहेत त्याचे खाजगीकरण करावे. 'याकरिता योजनांचे बिझनेस मॉडेल तयार करावे अशा सुचना मा.मंत्री. ग्रामविकास यांनी दिले. लातूर योजनेकरिता डिजीटल मिटर घेणे शक्य आहे का ते पहावे. व कार्यवाही करावी.

६. मजीप्रा. हे नामांकित पाणी पुरवठा व मलःनिस्सारण योजना तयार करणारे मंडळ आहे. याची माहिती (प्रसिध्दी)सर्वसामान्य जनतेला व्हावी याकरिता जाहिरातीसाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी असे मा.मंत्री तथा अध्यक्ष मजीप्रा यांनी निर्देश दिले.

७. इतर राज्यात पाणी पुरवठा योजना संचालनाच्या ज्या संस्थात्मक संरचना आहेत त्याचा अभ्यास करुन संचालक मंडळासमोर अहवाल सादर करावा.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री. पा.पु.व स्व.

8/5

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

7/5/20